तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web Site : - www.ropune.org.in

तंशिविकापु/विवि/पदविकाप्रवेशअर्ज विक्री/२०११/ 1020 दिनांक :- 17 OCT 2011

प्रति,

प्राचार्य,

एआरसी केंद्र (पदविका अभियांत्रिकी संस्था/औषधनिर्माणशास्त्र पदविका)

विषय :- एआरसी केंद्राकडे जमा रक्कमेमधून एआरसीची मानधनाची रक्कम वजा करुन घेऊन धनाकर्ष जमा करणेबाबत.

संदर्भ :- मा. संचालक, तत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १०/एनजीपी/पदविका/पुस्तिका/२०११/२५६/ दि ०८/०६/२०१०.

उपरोक्त संदर्भाधीन आदेशान्वये आपली संस्था पदविका अभियांत्रिकी प्रवेश अर्ज विक्री व अर्ज स्विकार केंद्र म्हणून घोषित करण्यांत आले होते. त्याप्रमाणे आपण आपल्या केंद्रावर झालेल्या प्रवेश अर्ज विक्रीचा हिशोब या कार्यालयास सादर केलेला आहे. परंतु एआरसी केंद्रांकडे जमा ऑप्शन फार्म व प्रवर्ग बदलाच्या रक्कमांमधून एआरसी केंद्राचे मानधन वजा करुन उर्वरित रक्कम या कार्यालयास जमा करावयाची होती. ती अद्याप आपल्याकडून या कार्यालयास जमा करण्यांत आलेली नाही.

या पत्राद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, एआरसी केंद्राकडे जमा रक्कमेतून आपल्या केंद्राचा मानधन वजा करुन उर्वरित रक्कमेचा धनाकर्ष मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांचे नांवे धनाकर्ष काढून त्वरीत या कार्यालयास जमा करण्यांत यावा.

(डी. एन. शिंगाडे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :- श्री . शिंदे प्रोगॅमर, यांना सदरचे पत्र संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.